Page :
Date : / /

# फुंकर

भावनांचे तरंग उठविते, मनाच्या तरल पटलावर ।
अशी असते ती नाजुक हळूवार फुंकर . . . . ॥ध्रु॥
फुंकर मारताच मातेने, बाळाच्या कोवळ्या जावळावर ।
भुरु भुरु उडून कसे, पुन्हा येती भाळावर ॥
जीव ओवाळून टाकावा त्याच्या, खुदु खुदु हसण्यावर ।
अशी असते ती नाजुक . -- . . . . . -- ॥१॥
अक्षरे गिरविते व मिटविते ही पुन्हा पुन्हा ।
ओल्या चिंब पाटीला मात्र सुकविते पुन्हा पुन्हा ॥
किती विशाल असतो त्याचा, नुसते फू फू करण्यावर,
अशी असते ती - . . . . . . . ॥२॥
डोळ्यातील धुळ अलगद फुंकरीने बाहेर यावी ।
थंडगार झुळूकीने, हळूच पापणी मिटावी ॥
जशी लाजरीची पान मिटली, दुरुनच स्पर्श झाल्यावर,
अशी असते ती - . . . . . . . ॥३॥
दुःखावर फुंकर घालते, प्रेमळ शब्दांची माया ।
आपुलकीने पुलकीत होते, आश्वस्त होते काया ॥
खंबीर होते मन, विश्वास बसतो जीवनावर ।
अशी असते ती . . . . . . . . ॥४॥
फुंकर घालताच, चूल लागते धुमसायला ।
आगीच्या ज्वाळा पुन्हा लागतात फुलायला ॥
मिळते भाकरी पोटाला, तृप्ती देई ढेकर .
अशी असते ती . . . . . . . . ॥५॥
बासरीच्या मुखरंध्राजवळ तो सावळा कान्हा ।
फुंकर घालतो, जीव ओततो, घेतो तानावर ताना ॥
तल्लीन होऊन डोलते, सारी सृष्टी, सारे चराचर,
अशी असते ती, नाजुक हळूवार फुंकर . . . . . . ॥६॥



सौ. शोभा पांडे
गुरुगणेशनगर कोथरुड पुणे